"नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक बहुसदस्यीय प्रभाग रचनेनुसार (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण) सुधारणा आदेश, २०२३"

सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:-रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.१० /का.०६
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई -४०० ०३२.
दिनांक:- ०३ मे, २०२३

## आदेश

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने नगर परिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता बहुसदस्यीय प्रभाग रचनेनुसार सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण निश्चित करण्याकरिता समक्रमांकाच्या दि. २७ डिसेंबर, २०२१ च्या आदेशान्वये सविस्तर कार्यपध्दती विहित केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयामधील विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६/२०२१ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.२० जुलै, २०२२ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन नगर परिषदांच्या निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवण्याच्या अनुषंगाने योग्य ती तरतूद करण्याकरिता राज्य निवडणूक आयोगाने दि.२२ जुलै, २०२२ च्या आदेशान्वये सुधारणा केली आहे;

आणि ज्याअर्थी सदर सुधारणेनुसार आदेशासोबत विहित केलेल्या परिशिष्ट-१ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. मात्र नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवताना त्याचे प्रमाण २७ टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घेण्याच्यादृष्टीने सदर परिशिष्टातील मुद्दा क्र.९ खाली दिलेली "टिप" सुधारीत करणे आवश्यक झाले आहे;

त्याअर्थी, मी, यु.पी.एस.मदान, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती, औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० व १०अ(४) नुसार मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करुन त्याअंतर्गत नगर परिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता दि.२७ डिसेंबर, २०२१ च्या आदेशान्वये विहित केलेल्या व त्यानंतर दि.२२ जुलै, २०२२ च्या आदेशान्वये सुधारीत केलेल्या परिशिष्ट-१ च्या मुद्दा क्र.९ खालील टिप खालीलप्रमाणे सुधारीत करीत आहे :-

"टिप" :-

(१) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांची गणना करताना ०.५० पेक्षा कमी असलेला अपूर्णांक दुर्लक्षित करण्यात यावा.

(२) तसेच ०.५० अथवा त्यावरील अपूर्णांक पुढील संख्येस पूर्णांकित करण्यात यावा, मात्र असे केल्यामुळे-

(अ) जर नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी आरक्षित जागांची संख्या ही एकूण जागांच्या २७ टक्क्यांपेक्षा अधिक होत असेल तर अपूर्णांक दुर्लक्षित करण्यात यावा.

उदा. जसे-

| | | |
|---|---|---|
| १ | एकूण जागा | २५ |
| २ | मागासवर्ग आयोगाने ना.मा.प्र.करिता शिफारस केलेली टक्केवारी | २६.८ % |
| ३ | मागासवर्ग आयोगाने शिफारस केलेल्या टक्केवारीनुसार ना.मा.प्र. जागांचे प्रमाण अपूर्णांक पूर्णांकित केल्यास येणाऱ्या जागा | $२५ \times \frac{२६.८}{१००} = ६.७ = ७$ |
| ४ | अ.क्र.३ नुसार एकूण सदस्य संख्येनुसार ना.मा.प्र. जागांची टक्केवारी | $\frac{७}{२५} \times १०० = २८$ टक्के |
| ५ | मात्र ना.मा.प्र. चे प्रमाण २७ टक्के मर्यादेत सिमित राखण्याकरिता ना.मा.प्र. च्या जागा या ७ ऐवजी ६ देय होतील. | ६ |

(ब) जर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्याकरिता आरक्षित ठेवावयाच्या एकूण जागांची संख्या ही एकूण जागांच्या ५० टक्क्यापेक्षा जास्त असेल तर एकूण जागांचे आरक्षण ५० टक्केच्या मर्यादेत सिमित राखण्याकरिता नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखून ठेवावयाच्या जागा त्या प्रमाणात कमी करण्यात याव्यात. उदा. जसे-

| | | |
|---|---|---|
| १ | एकूण जागा | २५ |
| २ | अनु.जाती. करिता लोकसंख्येच्या प्रमाणानुसार देय जागा | ५ |
| ३ | अनु.जमाती करिता लोकसंख्येच्या प्रमाणानुसार जागा | २ |
| ४ | मागासवर्ग आयोगाने शिफारस केलेली ना.मा.प्र.ची टक्केवारी | २४ % |
| ५ | मागासवर्ग आयोगाने शिफारस केलेल्या ना.मा.प्र. टक्केवारीनुसार येणाऱ्या जागा | $२५ \times \frac{२४}{१००} = ६$ |
| ६ | त्यानुसार एकूण आरक्षित जागांची येणारी संख्या (अ.क्र.२ + अ.क्र. ३ + अ.क्र.५) | ५ + २ +६ = १३ |
| ७ | मात्र एकूण आरक्षण ५०% पेक्षा अधिक देता येणार नाही, त्यामुळे ५० % आरक्षित जागांची गणना करताना अपूर्णांक आल्यास वगळावा लागेल. त्यानुसार कमाल देय आरक्षित जागा | $२५ \times \frac{५०}{१००} = १२.५ = १२$ |
| ८ | एकूण आरक्षित जागा १२ पेक्षा अधिक देता येणार नाही, एकूण आरक्षित जागांचे प्रमाण ५० टक्के मर्यादेत सिमित ठेवण्याकरिता ना.मा.प्र. ची जागा १ ने कमी करावी लागेल. त्यामुळे ना.मा.प्रवर्गाकरिता ६ ऐवजी ५ जागा देय होतील. | ५ |

(३) जर एखादया नगर परिषद अथवा नगर पंचायतीत एकूण जागांच्या संख्येत वाढ झाल्यास, त्या प्रसंगी देखील उपरोक्त परिच्छेद २(अ) व २(ब) चे निकष वापरण्यात यावे.

(यु.पी.एस.मदान)
राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

प्रति,

१) अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ००१.

२) प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
४) सर्व विभागीय आयुक्त
५) सर्व जिल्हाधिकारी
६) सर्व संबंधित नगरपरिषदांचे मुख्याधिकारी / प्रशासक
७) मा.सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
८) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने
९) निवड नस्ती